# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.05.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान मोदी आणि अंगोलाच्या राष्ट्राध्यक्षांची आज शिष्टमंडळ स्तरावर चर्चा
2. आंध्र प्रदेशातील अमरावती इथं 58 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
3. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत यजमान गुजरात टायटन्सकडून सनरायझर्स हैदराबादचा पराभव आणि
4. तेलंगणमध्ये 33 पैकी 20 जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाचा वादळाचा इशारा

**<u>अंगोला-अध्यक्ष</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोंकाल्विस लॉरेन्को यांच्यात आज नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा होईल. विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. अंगोलाचे अध्यक्ष काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत आले असून विमानतळावर परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी त्यांचे स्वागत केले. अंगोलाच्या अध्यक्षांसोबत अनेक मंत्री, वरिष्ठ अधिकारी, उद्योगपति आणि माध्यमांचे प्रतिनिधि यांचा समावेश असलेलं उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे.

लॉरेन्को यांचं आज राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात औपचारिक स्वागत केलं जाईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भेट देणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ आज राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या मेजवानी दरम्यान लॉरेन्को आणि मुर्मू यांच्यात चर्चा होईल.

अंगोलाच्या राष्ट्राध्यक्षांची 38 वर्षांनंतर भारत भेट होत आहे. भारत आणि अंगोला यावर्षी राजनैतिक संबंधांच्या स्थापनेचा 40 वा वर्धापन दिन साजरा करत आहेत.राष्ट्राध्यक्ष लॉरेन्को उद्या नवी दिल्ली इथं होणाऱ्या एका व्यवसायिक कार्यक्रमात सहभागी होतील. दोन्ही देशांमधील गुंतवणूक आणि व्यवसायिक संबंधांना चालना देण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

भारत आणि अंगोला यांच्यात गेल्या काही वर्षांत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले असून हे द्विपक्षीय संबंध ऊर्जा क्षेत्रातील भागीदारीवर आधारित असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार वाढत असून 2023-24 दरम्यान 4 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. विकासातील भागीदारी, क्षमता-निर्मिती सहकार्य आणि संरक्षण संबंध देखील विस्तारत आहेत. संयुक्त राष्ट्रांसह विविध बहुपक्षीय मंचांवर दोन्ही देश सोबत आहेत.

**<u>पंतप्रधान-आंध्र</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आंध्र प्रदेशातील अमरावती इथं 58 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन केलं तसंच काही प्रकल्पांची पायाभरणी करून ते राष्ट्राला समर्पित केले. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले की, हे प्रकल्प आंध्र प्रदेशच्या आकांक्षा आणि विकसित भारताच्या आशेचा पाया आहेत. गेल्या 10 वर्षांत देशानं भौतिक, डिजिटल आणि सामाजिक पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित केलं आहे. मोदी पुढं म्हणाले की, देशात पायाभूत सुविधा वेगानं विकसित होत असून आंध्र प्रदेशलाही या प्रगतीचा फायदा होत आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित

करत असून गेल्या 10 वर्षांत केंद्र सरकारनं शेतकऱ्यांना परवडणारी खतं आणि आधुनिक बियाणं पुरवण्यासाठी 12 लाख कोटी रुपये खर्च केल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

या वर्षीचा आंतरराष्ट्रीय योग दिन 21 जूनला आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथं साजरा केला जाईल असं सांगून पुढील 50 दिवसांत लोकांना योगाशी संबंधित अधिक उपक्रम राबविण्याचं पंतप्रधानांनी आवाहन केलं. यावेळी बोलताना आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अमरावती प्रकल्पाला पाठिंबा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला पूर्ण पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार केला.

**अमित शहा**

पंजाबमधील अमली पदार्थ नियंत्रण विभागाच्या अमृतसर विभागीय पथकाने गेल्या 4 महिन्यात 4 राज्यात व्यापक कारवाई करत सुमारे 547 कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले असून यासंदर्भात 15 जणांना अटक करण्यात आल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली आहे. यासंदर्भात समाजमाध्यमावर संदेश प्रकाशित करत त्यांनी एनसीबीच्या पथकाचं अभिनंदन केलं आहे. भारताने अमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक कडक आणि व्यापक करत या नशेच्या विरुद्ध लढाई तीव्र केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या नशा मुक्त भारताच्या दिशेनं ही कारवाई म्हणजे मोठ यश असल्याचं अमित शहा यांनी म्हटलं आहे.

**वेव्हज**

मुंबईतील वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट अर्थात वेव्हज 2025 मध्ये, क्रिएट इन इंडिया चॅलेंज अर्थात सीआयसी सीझन 1 काल संपला. सीआयसी अंतर्गत 32 वेगवेगळ्या आव्हानांच्या विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये ॲनिमेशन, गेमिंग आणि चित्रपट निर्मितीपासून ते कृत्रिम बुद्धिमत्ता, संगीत आणि डिजिटल कला अशा माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या प्रत्येक क्षेत्राचा समावेश होता. एक लाखाहून अधिक लोकांनी चॅलेंजसाठी नोंदणी केली. यात 60 हून अधिक देशांमधील 1100 हून अधिक आंतरराष्ट्रीय सहभागींचं समावेश होता. या चॅलेंजनं उदयोन्मुख प्रतिभेसाठी आणि तरुण मनांच्या उत्साही सर्जनशीलतेचे प्रदर्शन करण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ प्रदान केले. या प्रसंगी बोलताना केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा एक ऐतिहासिक क्षण असल्याचं सांगून, केवळ सर्जनशीलतेसाठी पहिल्यांदाच पुरस्कार दिला जात असल्याचं म्हणाले. या उपक्रमामुळे निर्मात्यांसाठी नवीन संधी उपलब्ध होत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**विमान-उड्डाण**

उत्तर प्रदेशच्या शाहजहांपुर जिल्ह्यात गंगा द्रुतगति महामार्गावर खास विमानांसाठी तयार करण्यात आलेल्या साडेतीन किलोमीटरच्या धावपट्टीवर काल भारतीय वायु दलाच्या वतीनं विविध प्रकारच्या लढाऊ आणि मालवाहू विमानांच्या उड्डाणांचं काल दिवसा आणि रात्री उत्कृष्ट प्रदर्शन करण्यात आल. युद्ध आणि आपत्कालीन काळात या महामार्गाचा उपयोग व्हावा हा यामागील हेतु असून अशाप्रकारे महामार्गावर विमानांच्या उड्डाणाचा हा पहिलाच प्रयोग होता. राफेल, जग्वार, मिराज-2000, सुखोई आणि मिग-29 आदि लढाऊ विमानांनी या प्रदर्शनात भाग घेतला तसच वायु दलाच्या सी-130जे सुपर हरक्युलिस आणि एएन-32या मालवाहू विमानांनी आणि एमआई-17, वी-5 या हेलीकॉप्टर्स् यांनीही यात भाग घेतला. यामुळे दिवसा आणि रात्री महामार्गावर विमानांच उड्डाण करण्याची क्षमता असणारे उत्तरप्रदेश हे देशातले पहिलेच राज्य ठरले आहे अस उत्तरप्रदेशचे मंत्री दानिश आजाद अंसारी यांनी सांगितल.

**सामंजस्य-करार**

दृश्य प्रभाव आणि निर्मिती पश्चात सेवांमध्ये जागतिक आघाडीवर असलेल्या डीएनईजी-प्राइम फोकस कंपनीसोबत महाराष्ट्र सरकारनं 3 हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार केला आहे. वेव्हज 2025 शिखर परिषदेदरम्यान जाहीर करण्यात आलेल्या या भागीदारीमुळं राज्यात अडीच हजार थेट रोजगार निर्माण होतील. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळं मनोरंजन उद्योगात लक्षणीय वाढ होत

असताना हे सहकार्य एक महत्त्वाचं पाऊल असून या करारामुळं चित्रपट निर्मिती आणि डिजिटल माध्यमाचं केंद्र म्हणून महाराष्ट्राचं स्थान मजबूत होईल तसंच राज्याच्या आर्थिक विकासातही योगदान मिळेल अशी अपेक्षा आहे.

**परकीय-चलन**

भारताच्या परकीय चलन साठ्यात 25 एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात अंदाजे 2 अब्ज डॉलर्सची वाढ झाली असून ती सुमारे 688 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. रिझर्व्ह बँकेनं प्रकाशित केलेल्या साप्ताहिक सांख्यिकी पुरवणीनुसार, गेल्या आठवड्यात, परकीय चलन मालमत्ता, 2 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक वाढून सुमारे 580 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. दरम्यान, विशेष कर्जपात्रता हक्क 21 दशलक्ष डॉलर्सनं वाढून 18 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये मध्यवर्ती बँकेची पतही 2 दशलक्ष डॉलर्सने वाढून साडेचार अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. तथापि, सोन्याचा साठा 207 दशलक्ष डॉलर्सनं कमी होऊन 84 पूर्णांक 37 शतांश अब्ज डॉलर्सवर आला आहे.

**आयपीएल**

अहमदाबादमध्ये आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल रात्री यजमान गुजरात टायटन्सनं सनरायझर्स हैदराबादचा 38 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सनं निर्धारित 20 षटकांत सहा गडी गमावून 224 धावा केल्या. गुजरातचा कर्णधार शुभमन गिलनं 38 चेंडूत 76 धावा केल्या, तर जोस बटलरनं 37 चेंडूत 64 धावा केल्या. हैदराबादकडून जयदेव उनाडकटनं तीन, तर पॅट कमिन्स आणि झीशान अन्सारी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल सनरायझर्स हैदराबादला 225 धावांचं लक्ष्य गाठता आलं नाही. त्यांनी 20 षटकांत 6 बाद 186 केल्या. हैदराबादकडून अभिषेक शर्मानं केवळ 41 चेंडूत 74 धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून प्रसिद्ध कृष्णानं केवळ 19 धावा देऊन 2 गडी बाद केले. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आलं.

**हवामानर**

हवामान विभागानं तेलंगणमध्ये 33 पैकी 20 जिल्ह्यांमध्ये बुधवारपर्यंत वादळाचा इशारा दिला आहे. हवामान विभागानं म्हटलं आहे की, राज्यातील अनेक भागात हवामानातील चढ-उतार सुरू राहण्याची शक्यता आहे. कुमुराम भीम आसिफाबाद, मंचेरियाल, करीमनगर, पेद्दापल्ली, जयशंकर भूपालापल्ली, मुलुगु आणि हैदराबाद या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह वादळाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं
## नमस्कार.